**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. सुरेश भिमसेन कागिनकर,
३/१०१, योगेश्वरगृहनिर्माण संस्था,
ना.म. जोशी, मार्ग, मुंबई ४०००१३. तक्रारदार

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१. गैरतक्रारदार

| | | |
|---|---|---|
| १. | तक्रार क्रमांक | १८५/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,<br>गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू.), मुंबई ४०००५१. | |

**विवेचन**

संक्रमण शिबिरातील भाडे पावतीची प्रत प्रमाणपत्राची प्रत इ. माहिती तक्रारदार श्री. सुरेश भिमसेन कागिनकर,यांनी मागितलेली होती. राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी त्याबाबतच्या त्या अपिलावर दि.४.२.२०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार अंमलबजावणी झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीची सुनावणी घेऊन राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी दि.२१.२.२०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.२.२०११ रोजी सुनावणी घेतली. जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती नि:शुल्क देण्याचे आदेश त्याना दिले. परंतु अद्यापही माहिती मिळालेली नाही. माहिती देण्यास म्हाडाचे अधिकारी टाळाटाळ करीत आहेत, अशी तक्रार तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केली आहे.

आयोगाच्या आदेशाप्रमाणे जुन्या नस्तीचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून श्री. सुरेश भिमसेन कागिनकर यांना देता आलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई यानी केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई, श्री.डी.एस.राऊळ हे निवृत्त झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

व्दितीय अपिलातील आदेशाचा कालावधी लोटल्यानंतरही व माहिती अग्रक्रमाने देण्याचे आदेश देऊनही माहिती मिळत नसल्याची तक्रारकर्त्याची तक्रार गंभीर स्वरुपाची आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई, श्री.डी.एस.राऊळ यांचेवर आयोगाने दंडात्मक कारवाई केली असून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई श्री. एस.जी.सूर्यवंशी, यांनी संबंधित कागदपत्रांचा अभिलेख, वर्गवारीच्या कालावधीनुसार शोध घ्यावा व ८ दिवसांत तक्रारदारास माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

**आदेश**

**१. तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**२. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल श्री. एस.जी.सूर्यवंशी, जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई यांनी दि.५.१२.२०११ पर्यत आयोगास सादर करावा**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा <u>अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेले तक्रार.</u>**

क्र.मुमाआ/६०७/तक्रार क्र.१८५/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक -

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१. निवडनस्ती
२. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. प्रेम किशन जैन,
अतिरिक्त पोलीस महासंचालक,
३१, यशोधन, सी.सी. आय समोर, डी.व्ही.रोड,
चर्चगेट, मुंबई ४०००२०. तक्रारदार

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा
उपसहाय्यक पोलीस महानिरीक्षक (लेखा),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१. गैरतक्रारदार

| | | |
|---|---|---|
| १. | तक्रार क्रमांक | १८८/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>उपसहाय्यक पोलीस महानिरीक्षक (लेखा),<br>पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,<br>मुंबई यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,<br>शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१. | | |
| | | |

## विवेचन

८२ बॉम्ब सूटस्‌ची खेरदीसाठी १०० टक्के आगाऊ रक्कम रुपये ६.२१ कोटी मेसर्स टेक्नोट्रेड इम्पेक्स इंडिया लि., मुंबई यांना जून २००९ मध्ये देण्यांत आले. बॉम्ब सूटस्‌ची खेरदी प्रत्यक्षात केली नाही व रक्कमही परत

दिलेली नाही याबाबतची तसेच नियम डावलून अशा प्रकारे खरेदीआधी रक्कम देणा-या अधिका-यावरील कार्यवाहीबाबतची माहिती जाणीवपूर्वक नाकारली जात आहे अशी तक्रार तक्रारकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अर्जात केलेली आहे.

संबंधित प्रकरणात गैरव्यवहार झाल्याच्या कारणावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरु आहे ती पूर्ण झालेली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ८ (१)(घ) (ड.) (छ) अन्वये माहिती देता येत नसल्याचे तक्रारकर्त्यांना कळविले असेल श्री. अे.अेस.चौगुले, जन माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीस महानिरीक्षक (लेखा), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी नमूद केले आहे.

बॉम्ब सुटस् निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबतची तक्रारकर्त्याची मागणी योग्य नाही बॉम्ब सुटस् खरेदी करण्याबाबत व बॉम्ब सूट ज्या कारणासाठी खरेदी करण्यांत येणार होते ते म्हणजे बॉम्ब हाताळण्यासाठी महाराष्ट्र पोलिस दलाकडे पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे आक्षेप तक्रारकर्त्यांनी नोदविले असून या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत दखल घेण्याच्या नाहीत. मात्र ' माहिती ' जाहीर होण्यात ' लोकहित ' साधण्याची खात्री पटत नसल्याचे जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन अयोग्य आहे. पोलिस दलासाठी खरेदी केलेल्या बॉम्ब सूटबाबतच्या व्यवहाराची माहिती जनतेला पारदर्शकतेने कळणे आवश्यक आहे, अशी माहिती दडविण्याऐवजी ती जाहीर करणे जनहिताचेच आहे. तथापि संबंधित प्रकरणी चौकशी सुरु असल्यामुळे चौकशीची कार्यवाही पूर्ण होईपर्यत माहिती उघड न करण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचा घेतलेला निर्णय योग्य आहे. पुरवठादाराला रक्कम अदा करण्याबाबत कोणती पध्दत अवलंबिली गेली. त्याबाबतचा निर्णय कोणत्या अधिका-याने घेतला, ही माहिती चौकशी चालू असतनाही गोपनीय ठरु शकत नाही व ती जाहीर करण्याने चौकशीवर कोणताही परिणाम होण्याची शक्यता नाही. त्यामुळे ही माहिती त्वरीत दिली गेली पाहिजे. परंतू मात्र संबंधित प्रकरणातील चौकशी पूर्ण होताच सर्व माहिती तक्रारकर्त्यास देण्याबरोबरच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-४ नुसार सर्व नागरिकांसाठी उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे.

**आदेश**

**३. तक्रार अमान्य करण्यांत येत आहे.**

**४. तक्रारकर्त्याच्या मागणीनुसार बॉम्ब सूटस खरेदीबाबत कोणती पध्दती अवलंबिली गेली पुरवठया आधी रक्कम देण्याबाबतचा निर्णय कोणत्या अधिका-यानी घेतला ही माहिती अनुषंगिक कागदपत्रासह तक्रारकर्ता यांना द्यावी. तसेच संबधित प्रकरणाच्या चौकशीच्या सद्यस्थितीची माहितीही जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास द्यावी. श्री. अे.अेस.चौगुले जन माहिती अधिकारी उपसहाय्यक पोलीस महानिरीक्षक (लेखा),पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी दि.१५.११.२०११ पर्यत आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा .**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

क्र.मुमाआ/८१८/तक्रार क्र.१८८/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३. निवडनस्ती
४. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.सुभाष नाथान निकम, **अपीलकर्ता**
आझमी नगर आकाशवाणी,
इमामबाडा रोड,मालवणी, गेट नं ७,
मालाड (प.), मुंबई ४०००९५.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,
पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, लिबर्टी गार्डन मामलेदार वाडी,
मालाड (प.), मुंबई ४०००६४.

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अभियंता( इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,
पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय, लिबर्टी गार्डन मामलेदार वाडी,
मालाड (प.), मुंबई ४०००६४.

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८११/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३. उपस्थित**<br>**अपिलकर्ता** श्री.सुभाष नाथान निकम,<br>आझमी नगर आकाशवाणी,<br>इमामबाडा रोड,मालवणी, गेट नं ७,<br>मालाड (प.), मुंबई ४०००९५. | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अनधिकृत बांधकामाबाबत वारंवार तक्रारी करुनही कारवाई केली जात नाही म्हणून कारवाई का केली नाही व केव्हा केली जाईल, याची माहिती मागितली होती परंतु प्रथम अपिलातील निर्णयानंतरही कोणतीही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपिलकर्ता श्री.सुभाष नाथान निकम यांनी केली.

श्री.वैभव अमृसकर, जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता( इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,मालाड(प)मुंबई व श्री. व्ही. जे देसाई, प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक पालिका आयुक्त,पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,मालाड(प) मुंबई सुनावणीला उपस्थित नव्हते. त्याबाबत त्यानी कोणताही खुलासा आयोगाला सादर केलेला नाही. मात्र शुल्क भरण्यास कळवूनही अपीलकर्ता यानी शुल्क भरले नसल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रात नमूद केल्याचे दिसून येते. श्री.वैभव अमृसकर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय मालाड (प)मुंबई व श्री.व्ही.जे.देसाई, अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय मालाड (प)मुंबई यानी अपिलकर्त्याच्या मुळ अर्जावर माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा सादर करणे आवश्यक आहे. मात्र खुलासा, स्पष्टीकरण, कारणे,अशी विचारणा 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' अंतर्गत 'माहिती ' च्या व्याख्येत येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यांत येत आहे.

**<u>आदेश</u>**

**१. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२. श्री. वैभव अमृसकर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय मालाड (प)मुंबई व श्री.व्ही.जे.देसाई, अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय मालाड (प)मुंबई यांनी आयोगापुढील सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबाबतचा खुलासा दि.१५.११.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.**

**३. अपीलकर्ता यांच्या अर्जावर माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा तारीखवार अहवाल संबधित कागदपत्राच्या प्रतींसह श्री. वैभव अमृसकर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय मालाड (प)मुंबई, मालाड, मुंबई यांनी दि.१५.११.२०११ पर्यत आयोगास सादर करावा**

**४. माहिती व उत्तर देण्यास विलंब झाला असल्यास त्याबाबतचे कारण व शास्तीविषयक त्यांचे म्हणणे श्री.वैभव अमृसकर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/उत्तर विभाग यांचे कार्यालय मालाड (प)मुंबई यांनी अहवालात नमूद करणे आवश्यक आहे.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१३/अपी क्र.६८११/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

५. निवडनस्ती
६. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.कौस्तुभ दतात्रय गोखले **अपीलकर्ता**
सिध्दिविनायक प्रसाद, डॉ.शामाप्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली पूर्व ४२१२०१, ता.कल्याण जि.ठाणे.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव
नगर विकास विभाग (नवि.२१)
मंत्रालय,मुंबई ३२

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी
नगर विकास विभाग (नवि.२१)
मंत्रालय,मुंबई ३२

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८४४/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३. उपस्थित.**<br>**श्री. राजेंद्र पाध्ये, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**<br>नगर विकास विभाग (नवि.२१)<br>मंत्रालय,मुंबई ३२ | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

श्री.आर.के.सोनावणे यांची उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती केल्याच्या संदर्भात दि.१६.५.२००५ रोजी केलेल्या अर्जावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१५.७.२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार माहिती मिळावी, अशी मागणी करणारा अर्ज दि.९.९.२०१० रोजी केला होता. परंतु त्यानुसार माहिती देण्यांत आली नाही. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,नगर विकास विभाग (नवि.२१) यांच्या पत्रानुसार मुळ अर्जाची प्रत सादर केल्यानंतरही माहिती मिळाली नाही व अपिलीय अधिकारी, तथा नगर विकास विभाग

(नवि.२१) यांनी अपिलाची दखल घेतली नाही अशी तक्रार अपीलकर्ता श्री. कौस्तुभ गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील अर्जात केली लेखी निवेदनाव्दारे श्री.राजेद्र पाध्ये,जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,नगर विकास विभाग (नवि.२१) यांना रुपये २५,०००/- शास्ती लावण्याची मागणी केली आहे.

श्री. गोखले यांच्या दि.९.९.२०१० रोजीच्या अर्जानुसार तपासणी केली असता त्याचा दि.१६.५.२००५चा अर्ज कार्यालयात उपलब्ध झाला नाही तसे त्यानी दि.१४.१०.२०१०रोजीच्या पत्रान्वये कळविले. दि.९.११.२०१० च्या पत्रान्वये त्यांनी पाठविलेली मूळ अर्जाची प्रत दि.१६.११.२०१० रोजी प्राप्त झाली या अर्जाच्या संबंधातील श्री. सोनावणे यांच्या नियुक्तीच्या संदर्भातील कागदपत्रे कार्यालयात सन १९९४-९५ शी संबंधित असून ती कार्यालयात न आढळल्यामुळे श्री.गोखले याना तसे कळविले. काही मुद्यांमध्ये ( मुद्या क्र.६,८,९) मध्ये श्री. गोखले यानी स्पष्टीकरण व नियमांचे अन्वयाथ अशा स्वरुपाची विचारणा केली असून ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन श्री.राजेंद्र पाध्ये ,जन माहिती अधिकारी, तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग नवि-२१ यांनी केले.

दि.१६.५.२००५ च्या अर्जानुसार माहिती प्राप्त झाली नसल्याचे श्री. गोखले यांनी अपरल अर्जात म्हटले असले तरी कागदपत्रांची पडताळणी करता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.९.६.२०१०च्या पत्रानुसार त्यांना मुद्देनिहाय उत्तर दिल्याचे दिसून येते असे लेखी निवेदन श्रीमती सीमा ढमढेरे, प्रथम अपिलीय अधिकारी, सहसचिव,नगर विकास विभाग यांनी सादर केले.

उभय बाजुचे निवेदन व सादर करण्यांत आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी, नगर विकास विभाग, नवि-२१ यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तत्कालीन श्री.आय.एम मोरे,प्रथम अपिलीय अधिकारी, तथा सहसचिव, नगर विकास विभाग, नवि-२१ यांनी दि.२३.११.२०१० रोजी सूनावणी घेतली असल्याचे श्रीमती सीमा ढमढेरे विद्यमान अपिलीय अधिकारी, तथा सहसचिव,नगर विकास विभाग, नवि-२१ यांनी नमूद केले असले तरी त्याबाबतचे आदेश उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. अपिलीय अधिकारी यांचे लेखी आदेश निर्गमित होणे आवश्यक असल्याची समज श्री.आय.एम.मोरे, तत्कालीन अपिलीय अधिकारी, नगर विकास विभाग, नवि-२१ यांना देण्यांत येत आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही लक्षात घेता अपिलकर्त्याची शास्तीची मागणी अमान्य करण्यांत येत आहे. श्री. सोनावणे यांच्या नियुक्ती प्रकरणातील नस्ती सन १९९५ मधील असून ती उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता, अभिलेख वर्गवारी नुसार या कागदपत्रांचा जतन कालावधी तपासून जतनाची जबाबदारी असणा-यांचा खुलासा प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी यांनी या खुलाशासह स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल आयोगास १५ दिवसांचे आत सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतू तसा अहवाल अद्यापपर्यत प्राप्त झालेला नाही, ही गंभीर बाब आहे.

## आदेश

**१. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित मुदतीत सादर न करण्याबाबतच्या खुलाशासह अहवाल श्री.राजेंद्र पाध्ये, जन माहिती अधिकारी, नगर विकास**

**विभाग, नवि-२१, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी दि.१५.११.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास ते पुढील कारवाईस पात्र ठरतील.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.२६/अपी क्र.६८४४/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

७. निवडनस्ती
८. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,

मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.कौस्तुभ दतात्रय गोखले **अपीलकर्ता**
सिध्दिविनायक प्रसाद, डॉ.शामाप्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली पूर्व ४२१२०१, ता.कल्याण जि.ठाणे.

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा उपआयुक्त (सा.प्र.)
सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,
कल्याण (पश्चिम)जि.ठाणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.आयुक्त (सा.प्र.)
सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,
कल्याण (पश्चिम)जि.ठाणे

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८३३/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| ३. उपस्थित.<br>श्री.विनय भिकाजी कुलकर्णी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त<br>सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,कल्याण (पश्चिम)जि.ठाणे | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

श्री. आर.के.सोनवणे यांची दि.५.१२.१९९४ रोजीच्या आदेशान्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिका उपायुक्तपदी नियुक्ती करण्यांत आली. त्याबाबतच्या निकषांची माहिती नेमकेपणाने दिलेली नाही. या पदासाठी दिलेल्या जाहिरातीमधील निकष पाहता ५ वर्षे अनुभवाचा निकष पूर्ण झालेला नाही. तसेच शैक्षणिक अर्हता इत्यादि बार्बीचीही स्पष्टता नाही. त्यामुळे दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. या पदासाठी इतर व्यक्तींनी अर्ज केले असल्यास त्यांच्या लेखी परिक्षेबाबतचा तपशील कागदपत्रांच्या प्रतींसह मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात केलेली आहे.

श्री. कौस्तुभ गोखले यांच्या दि.२४.८.२०१० च्या अर्जाला दि.२२.९.२०१० रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. या पदासाठी दिलेल्या जाहिरातीची प्रत त्याना देण्यांत आली असून निकष त्यात नमूद आहे. या पदासाठी इतर व्यक्तींचे अर्ज व लेखी परीक्षा याबाबतची माहिती अभिलेखात उपलब्ध नाही. त्यामुळे ती देता येत नसल्याचेही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका, श्री. कृष्णा लेंढेकर यानी त्यांना पत्रान्वये कळविले. श्री.सोनावणे यांच्या नियुक्ती संदर्भातील काही कागदपत्रांच्या प्रती देण्याचे आदेश प्रथम अपिलीय अधिकारी, उप आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,श्री.दिपक दे. कुरळेकर यानी दिले. त्यानुसारही उपलब्ध माहिती श्री.कौस्तुभ गोखले याना पुरविली. मात्र संबंधित निवड नस्ती ही सन १९९५ ची असून ती पालिका कार्यालयात

उपलब्ध होत नसून शोध घेण्याचे काम अद्यापही सुरु आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तथा सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका, श्री.विनय भिकाजी कुळकर्णी यांनी पूरक कागदपत्रासह केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,श्री. कृष्णा लेंढेकर व प्रथम अपिलीय अधिकारी उप आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,श्री.दिपक दे. कुरळेकर यांनी माहिती देण्याबाबत उपलब्ध कागदपत्रानुसार योग्य कार्यवाही केली आहे. संबंधित अधिका-यांच्या नियुक्तीच्या निकषांची पूर्तता झाली आहे किंवा नाही, अशा स्वरुपाचे अपीलकर्त्यानी उपस्थित केलेले प्रश्न उत्तरे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाहीत.

श्री.सोनावणे यांचे सेवापुस्तक व वैयक्तिक नस्ती अवलोकनासाठीही उपलब्ध असल्याचे श्री.कौस्तुभ गोखले याना कळविण्यांत आले असल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते व अभिलेख्याच्या वर्गवारीनुसार जतनाचा कालावधीत उपलब्ध होत नसल्यास जतन करण्याची महाराष्ट्र सार्वजिनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. नस्तीचा शोध घेऊन संबंधितांकडून खुलासा मागवून घेऊन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,श्री. विनय कुळकर्णी यांनी याबाबतचा अहवाल आयोगास सादर करणे आवश्यक आहे.

<u>**आदेश**</u>

**१. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील निवड नस्ती अभिलेख वर्गवारीनुसार जतनाच्या कालावधी उपलब्ध होत नसल्यास जतनाची जबाबदारी असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी याचा खुलासा प्राप्त करुन घेऊन सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये पुढील कार्यवाही प्रथम अपिलीय अधिकारी उप आयुक्त सामान्य प्रशासन विभाग, कल्याण डोंबिवली महानगर पालिका,श्री.दिपक दे. कुरळेकर यांनी करावी व याबाबतचा अहवाल आयोगास दि.१५.१२.२०११ पर्यत सादर करावा.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा <u>अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१५/अपी क्र.६८३३/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक -

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

३. निवडनस्ती
४. स्वीय सहाय्यक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री.महंमद हमीद शेख, **अपीलकर्ता**
नेहरु नगर, चाळ नं.५ शॉप नं.११,
संत ज्ञानेश्वर नगर, बांद्रा पूर्व, मुंबई ४०० ०५१

cic-nov 2011

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (परि-१)
बृहन्मुंबई महानगर पालिका एन-विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोपर पूर्व, मुंबई ७७

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक अभियंता (परि-१)
बृहन्मुंबई महानगर पालिका एन-विभाग कार्यालय,
जवाहर रोड, घाटकोपर पूर्व, मुंबई ७७

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९५७/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. ५.१०.२०११ |
| ३. अनुपस्थित | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आयोगाच्या सुनावणीला संबंधित अधिकारी व अपीलकर्ता गैरहजर होते. सुनावणीचे सूचना पत्र सुनावणीच्या तारखेनंतर मिळाल्यामुळे उपस्थित राहता आले नसल्याचा खुलासा श्री.मनोज वाघ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पररिक्षण)एन विभाग यांनी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(परिरक्षण)एन विभाग, मुंबई यांनी दि.१५.१०.२०११ च्या पत्रान्वये केला आहे. अपीलकर्ता यांनी काहीही कळविलेले नाही.

उभय बाजूंनी सादर केलेले कागदपत्र विचारात घेता,माहिती चुकीची मिळाली असल्याचे व प्रथम अपिलाची सुनावणी ५० दिवस पूर्ण होऊन देखील घेण्यांत आली नसल्याचे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात म्हटले आहे मात्र त्यांच्या दि.२६.८.२०१० च्या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि.१.९.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि.१.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,(पररिक्षण)एन विभाग, मुंबई यांनी दि.९.११.२०१० रोजी घेतली. या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी, तथा कार्यकारी अभियंता,(पररिक्षण) एन-विभाग, मुंबई यांनी आदेशाची प्रतही अपीलकर्त्यास पाठविली असूनसुध्दा प्रथम अपिलाची सुनावणी झाली नाही व कोणतेही पत्र मिळाले नाही, असे अपीलकर्त्यानी दि.२१.१२.२०१० रोजीच्या अपील अर्जात नमूद करणे हे आयोगाची दिशाभूल करणारे आहे. त्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यांत येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी, तथा कार्यकारी अभियंता,(पररिक्षण) एन-विभाग, मुंबई , जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पररिक्षण)एन विभाग यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा <u>अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.१८४/अपील क्र.६९५७/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक -

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
१.निवडनस्ती
२.स्वीय सहाय्यक
३.आवक लिपिक

**<u>राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल झालेली तक्रार</u>**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

प्रति,
श्री. भोला. एच. तांबोळी, तक्रारदार
सचिव, महाराष्ट्र प्रदेश
अखिल भारतीय सफाई मजदूर (कॉ.)
१५ क्वीन्स गार्डन, पुरंदर बिल्डिंग नं.क्यू.रुन.६८, पुणे-१

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी(नवि-६) उत्तरवादी
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

| | | |
|---|---|---|
| १. | तक्रार क्रमांक | १८२/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१.०९.२०११ |
| **३. उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी(नवि-६)<br>नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई | | |
| | | |

**<u>विवेचन</u>**

आयोगापुढील सुनावणीत तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:-

**तक्रारदार** :- सफाई कामगाराच्या वारसा हक्काबाबत शासन निर्णयाच्या अनुषंगाने कागदपत्रांच्या प्रती व केलेली कार्यवाही याची माहिती मागितली होती. सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्याने जन माहिती अधिकारी यांना शास्ती करावी. सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करावी, या मागणीच्या संदर्भात प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना पाठविलेल्या पत्राचे उत्तर देण्याचे आदेश राज्य मुख्य माहिती आयुक्त यानी दिले होते. परंतु त्यानुसार योग्य ती कार्यवाही झालेली नाही.

**जन माहिती अधिकारी** :- तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची बदली झालेली आहे. तक्रारदाराना सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबतचे शासन निर्णय,आदेश टिप्पणी इत्यादि सर्व कागदपत्रांच्या प्रती वेळोवेळी

देण्यात आल्या आहेत. राज्य माहिती आयोगाकडे त्यानी केलेल्या अपिलांवर/तक्रारींवर आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार अभिलेख अवलोकनासाठी तक्रारदाराना कळवूनही तक्रारदार उपस्थित राहिले नाहीत. श्री.तांबोळी यांचे अपिलावर निर्णय देताना राज्य मुख्य माहिती आयुक्तानी 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खुलासा किंवा मार्गदर्शन देणे अभिप्रेत नाही. परंतु अर्जदाराने दिलेल्या पत्रास अनुसरुन समुचित उत्तर तीन महिन्यांचे आत द्यावे', असे आदेशात म्हटलेले होते. श्री.तांबोळी यांच्या आतापर्यंतच्या विविध मुद्दयांच्या अनुषंगाने सचिव, नगर विकास विभाग यानी दि.१७.११.२००८ रोजी बैठक घेऊन त्यांच्या सर्व मुद्दयांचे निरसन केले आहे. तक्रारदाराची मागणी मुख्यत्वे प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याना कोणतीही माहिती अथवा कागदपत्राच्या प्रती नाकारलेल्या नाहीत.

उभय बाजूंची निवेदन व तक्रारदारांची कागदपत्र पाहता सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबतच्या प्रशासकीय कार्यवाहीची मागणी व ही कार्यवाही योग्य प्रकारे होत नसलयाची त्यांची तक्रार ही बाब राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील नाही.

तक्रारदारास माहिती देण्यात आली असून आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदाराच्या पत्रास उत्तर देण्याबाबत विलंब लागला असला तरी तो माहिती देण्यास झालेला विलंब आहे, असे ठरत नाही. जन माहिती अधिकारी यानी सुनावणीच्या वेळी सादर केलेले लेखी निवेदन पाहता तक्रारदाराच्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहितीबाबत योग्य कार्यवाही केलेली आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार अमान्य करण्यात येत आहे.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्तं**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा <u>अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

क्र.मुमाआ/३८०८३ /तक्रार क्र.१८२/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक -१८.१.२०१२

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१.निवडनस्ती
२.स्वीय सहाय्यक
३.आवक लिपिक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. दिलीप एल.लालका **अपीलकर्ता**
१०१, शिल्पी हौसिंग सोसायटी लिमिटेड,इंद्रप्रस्थ पार्क
पारिजात बिल्डिंग समोर,९०फिट रोड, मुलुंड पूर्व, मुंबई ४०००८१

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा उपमुख्य अभियंता
उपमुख्य अभियंता कार्यालय, बृहन्मुंबई महानगर पालिका(इ.व का.)
ईस्टन सर्बब, राज लिगेसी, एल.बी.एस. मार्ग विक्रोली(वेस्ट)
मुंबई -४ ०००८३

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता **उत्तरवादी**
उपमुख्य अभियंता कार्यालय, बृहन्मुंबई महानगर पालिका(इ.व का.)
ईस्टन सर्बब, राज लिगेसी, एल.बी.एस. मार्ग विक्रोली(वेस्ट)
मुंबई -४ ०००८३

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९७८/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २१. ०९. २०११ |

| | |
|---|---|
| ३.उपस्थित<br>**अपीलकर्ता** - श्री. दिलीप एल.लालका<br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (तत्कालीन)<br>उपमुख्य अभियंता कार्यालय, बृहन्मुंबई महानगर पालिका(इ.व का.)<br>ईस्टन सर्बब, राज लिगेसी, एल.बी.एस. मार्ग विक्रोली(वेस्ट)<br>मुंबई -४ ०००८३ | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीनी पुढील प्रमाणे निवेदन केले:-

गृहनिर्माण संस्थेच्या पुर्नविकास प्रकल्पासाठी विकासकाला दिलेले इंटिमेशन ऑफ डिसअॅप्रुव्हल (आय.ओ.डी), तसेच इमारत बांधून झाल्यावर विकासकाने प्रत्येक सभासदाशी केलेला करार याबाबतची माहिती मागितली होती. संबंधित पुर्नविकास प्रकल्पाला मान्यता मिळालेली नसताना त्याना भोगवटापत्र (commencement certificate), तसेच इमारत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र कसे दिले, याचा खुलासा दिला पाहिजे.

**जन माहिती अधिकारी** :अपीलकर्ता यांच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यानी मागितलेली माहिती अभिलेखानुसार देण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे संबंधित प्रकल्पाबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. याच माहितीच्या संदर्भात श्रीमती लक्ष्मी दिलीप लालका यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपील क्र.४२८५ मध्ये तत्कालीन राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी यापूर्वी निर्णय दिलेला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आलेली आहे. नियमानुसार कार्यवाही न झाल्याबाबतचा त्यांचा आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.४०१/अपील क्र.६८३१/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,

मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक -

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
१.निवडनस्ती
२.स्वीय सहाय्यक
३.आवक लिपिक

**<u>राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. विरेंद्र पांडे **अपीलकर्ता**
१० कुलसूमबाई को.ऑप.हौ.सो.प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ(पूर्व) मुंबई ४०० ०५५

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (विशेष)
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक पालीका आयुक्त एच/पूर्व विभाग
१३७ टीपीएस ५, २ रस्ता, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०००५५

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अभियंता (परिरक्षण)
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक पालीका आयुक्त एच/पूर्व विभाग
१३७ टीपीएस ५, २ रस्ता, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ पूर्व,मुंबई ४०००५५

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८४३/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २९. ०९. २०११ |
| ३.उपस्थित<br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता यांचे प्रतिनिधी<br>श्री.प्रकाश स.पाटील,<br>**जन माहिती अधिकारी**,सहाय्यक अभियंता, (तत्कालीन)`<br>श्री.जिवक संतोष घेगडमल | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

एच/पूर्व विभागामध्ये फूटपाथवर व अन्य जागी बांधकाम करण्यासाठी सेवाभावी संस्था/राजकीय संघटना यानी दिलेल्या परवानगी बाबतची माहिती (जानेवारी २००३ ते जानेवारी २०१० कालावधीतील) अपीलकर्ता श्री.

विरेंद्र पांडे यानी मागितलेली होती. खोटे प्रतिज्ञापत्र देऊन, जागेचा बेकायदेशीर वापर करणे, इत्यादिबाबत दोषी ठरणा-यावर नियमानुसार कोणती कारवाई किंवा शिक्षा होते, अशी विचारणाही अपीलकर्ता यानी केली होती. त्याबाबतची माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. अपीलकर्ता यांना आयोगाने दोन वेळा सुनावणीची संधी देऊन ते सुनावणीस उपस्थित राहिलेले नाहीत.

अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती एच/पूर्व विभाागात परिरक्षित केली जात नसल्याने देता आली नाही,असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

संबंधित माहिती ज्यांच्याकडे मागितली आहे त्यांच्या कक्षेतील नसल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे ५ दिवसांत अर्ज वर्ग करणे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार आवश्यक आहे. तशी कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी करावयास हवी होती, याबाबतची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.जिवक संतोष घेगडमल यांना देण्यांत येत आहे. योग्यत्या विभागाकडे अर्ज करण्याबाबत अपीलार्थीस कळविण्यांत येत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी लेखी निवेदनाव्दारे आयोगास कळविले आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.२२/अपील क्र.६८४३/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक ३

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,
१.निवडनस्ती
२.स्वीय सहाय्यक

३.आवक लिपिक

**<u>राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

श्री. सॅम भार्गव
अे-४०१, दिलबहार को.ऑप हौसिंग सोसयटी **अपीलकर्ता**
महिला मंडळ रोड, सांताक्रुझ (पश्चिम) रेल्वे स्टेशनजवळ,मुंबई ४०० ०५४

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** तथा **अप्पर पोलिस आयुक्त**
अप्पर पोलिस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग यांचे कार्यालय, मधु इंडिस्टियल इस्टैट पहिला मजला,
पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई १३
**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस उपआयुक्त
अप्पर पोलिस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग यांचे कार्यालय, मधु इंडिस्टियल इस्टैट पहिला मजला,
पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई १३

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६८२२/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २९. ०९. २०११ |
| ३. उपस्थित<br>**अपिलकर्ता-** श्री. सॅम भार्गव<br>**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर पोलीस उपआयुक्त(प्रतिनिधी)<br>श्री.ए.पी.सावंत | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

आयोगापुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता : न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त केलेले स्पेशल बेअरर बॉन्ड खुले करण्याबाबतचे आदेश न्यायालयाने देऊनसुध्दा तसे केलेले नाही. या बॉन्ड्सचे नूतनीकरण/पुनर्गुंतवणूक करण्याबाबत न्यायालयाचे आदेशानुसार कोणती कार्यवाही केली याची माहितीही दिली जात नाही.
अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी : अपिलार्थीना कळविलेले शुल्क भरल्यानुसार माहिती पुरविण्यांत आली. अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अधिक तपशील व न्यायालयात पाठविलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने ऊर्वरित माहितीही नंतर पुरविण्यात आली. सन १९८६ चे हे प्रकरण असल्याने उपलब्ध माहिती दिलेली आहे.

सन १९९६ मध्ये २०११ या काळात बॉन्डचे नुतनीकरण//पुनर्गुंतवणूक केलेल्या कार्यवाहीची माहिती, रोजनाम्यात नोंदी असल्यास त्याच्या प्रतींसह अपीलकर्त्यास देऊन १५ दिवसांत आयोगास अहवाल सादर करावा. अपीलकर्त्यास हवी असल्यास न्यायालयाकडे अर्ज करुन या संदर्भातील माहिती मागावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१४ ऑक्टोबर २०११ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला. संबंधित मूळ प्रकरणातील पुढील सुनावणी दि.१८.१०.२०११ रोजी न्यायालयात होणार असून दि.५.९.२०११ रोजी सहाय्यक पोलिस आयुक्त श्री. रमेश रत्नपारखी यांनी विशेष न्यायालयात अहवाल सादर केला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या या अहवालात नमूद केले आहे. सदरच्या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाठवावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र.४९३९१/अपील क्र.६८२२/०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक -

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१.निवडनस्ती
२.स्वीय सहाय्यक
३.आवक लिपिक

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

**श्रीमती मुमताज अब्दुल करीम**
रुम नं.ए-६२०, प्रभाकर कुंटे नगर, **अपीलकर्ता**
गौसिया मस्जिद गल्ली, ९० फूट रोड,
कुंभारवाडा, धारावी, मुंबई ४०० ०१७

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा.आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका जी/उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६९२७/२०११/मुंबई |
| २. | सुनावणीची तारीख | दि. २९. ०९. २०११ |
| ३.उपस्थित<br>**अपिलकर्ता**<br>श्रीमती मुमताज अब्दुल करीम<br>**जन माहिती अधिकारी** तथा वसाहत अधिकारी,<br>(श्री.झडे एच.एन) | | |
| ४. | माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले:-
**अपीलकर्ता** : मसिहा इस्लामपुरा को.ऑप.सोसायटी लि.धारावी, मुंबई या सोसायटीमध्ये दोन व्यक्तींना खोटया कागदपत्राच्या आधारे व्यावसायिक गाळे दिले. त्याबाबतची माहिती मागितली होती. दुकान गाळ्यांची मागणी

करुनही मला गाळा दिलेला नाही आणि अधिका-यांशी संगनमत करुन इतर काहींना खोटया कागदपत्राच्या आधारे बेकायदेशीरपणे गाळ्याचे वाटप केलेले आहे.

**जन माहिती अधिकारी** :- सदरची सासोयटी सन २००८ मधील असून अपीलकर्त्याची दोन गाळ्यांची मागणी असताना एकच गाळा दिला असल्यामुळे असे तक्रारवजा अर्ज व अपिले ते सातत्याने संबंधित विभागाकडे करीत आहेत. एकूण २८ व्यावसायिक गाळे असून उपलब्ध झाली तेवढी माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. मूळ अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यानी दोनच गाळेधारकाबाबतची माहिती मागितलेली आहे आणि आता सर्व गाळ्यांच्या संदर्भातील माहितीची मागणी ते करीत आहेत.

अपीलकर्ता यांनी मुळात दोन गाळेधारकांची माहिती मागितलेली आहे. अपिलात मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती मागता येणार नाही. तसेच गाळे वाटपासंदर्भातील कायदेशीरपणा, कागदपत्रांचा खरे-खोटेपणा इत्यादीबाबत अपीलकर्ता यांनी उपस्थित केलेले मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. तथापि सार्वजनिक प्राधिकरणातील कारभाराच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने २८ गाळ्यांबाबतची कागदपत्रे अपीलकर्त्यास नि:शुल्क पुरवावी. संबंधित सोसायटीकडून ही कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

## आदेश

१. **अपील निकाली काढण्यात येत आहे.**
२. **अपीलकर्त्यास २८ गाळ्यांबाबतची माहिती देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी करुन हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**<u>राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

क्र.मुमाआ/नोंदणी क्र ./अपील क्र. /०२
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.

दिनांक - जानेवारी २०१२

मा.मुख्य माहिती आयुक्त यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.

सचिव,
राज्य माहिती आयोग, मुंबई

प्रत,

१.निवडनस्ती
२.स्वीय सहाय्यक
३.आवक लिपिक